ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

भारतीय शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास

डॉ. शिवाजी झांझुरणे श्री. राजेंद्र घाडगे सहा. प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग कला व वाणिज्य महाविद्यालय, सातारा.
Email:shivajizanzurne@gmail.com, rajghadage2011@gmail.com

प्रस्तावना (Introduction)

शेतमजूर हा भारताच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आणि ग्रामीण भागातील आर्थिक व सामाजिक जीवनाचा एक अविभाज्य व महत्वपूर्ण घटक आहे. शेतकऱ्याला पेरणीपूर्व मशागतीपासून ते पीक घरात येईपर्यंत शेतमजुरांची आवश्यकता असते. शेतमजूर मिळाले तर पिकांची निगा योग्यप्रकारे राखली जाऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होते. पण जर योग्य वेळी शेतमजूर कामासाठी मिळाले नाहीत तर शेती उत्पादनात मोठया प्रमाणात घट होवून शेतकऱ्यांचे नुकसान होते. म्हणजेच शेती व शेतकऱ्यांच्या दृष्टीने शेतमजुरांची उपयुक्तता अत्यंत आहे. परंतु दुर्दैव असे की, स्वत: शेतमजुराला मात्र अत्यंत गरीब, हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगावे लागत आहे.

शेतमजुरांची मोठी संख्या व त्यामध्ये सातत्याने होणारी वाढ, शेतमजूरांचे अत्यल्प, बेभरवशाचे तसेच चढ–उताराचे उत्पन्न, समाजातील खालच्या स्तरातील जीवनमान, सातत्याने होणारी पिळवणूक, मागासलेले राहणीमान, सार्वजनिक बेरोजगारी, कर्जबाजारीपणा, संघटनेचा अभाव, त्यांच्यातील अज्ञान व निरक्षरता इत्यादीमुळे देशातील दारिद्रेरेषेच्या खाली असणाऱ्या लोकसंख्येत शेतमजुरांचेच प्रमाण मोठे आहे. शिवाय शेतीच्या यांत्रिकीकरणामुळे कामाचे दिवस उत्तरोत्तर घटत चालले आहेत, किमान वेतनाचीही योग्य अंमलबजावणी होत नाही. गेल्या अनेक वर्षात त्यांच्या मजुरीत वाढ झालेली नाही. त्यामुळे शेतमजुराला केंव्हा किती मजूरी मिळेल याची काहीही शाश्वती नसते.

तसेच बहुसंख्य शेतमजूर हे कर्जबाजारी आहेत. एका अभ्यासानुसार शेतमजूर कुंटूबाच्या एकूण खर्चापैकी सुमारे ८० टक्के रक्कम अन्नधान्य या जीवनावश्यक बाबींवर खर्च केली जाते. शिवाय मिळणारे अन्नधान्य अपुरे आणि हलक्या दर्जाचे देखील असल्याचे आढळून आले आहे.

एकूणच, सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थिती सर्व बाजूने शेतमजूरांचा कोंडमारा करत असल्यामुळे अलिकडील काळात त्यांची परिस्थिती अधिकच खालावलेली आहे. शिवाय भारतातील शेतमजूर हजारो खेडयात विखुरलेले असल्यामुळे शेतमजुरांच्या स्थितीचा अभ्यास करण्याकडे आतापर्यंत पाहिजे त्या प्रमाणात लक्ष दिले गेले नाही. परंतु देशाचा सर्वांगिण व जलद गतीने विकास करावयाचा असेल तर देशाच्या आर्थिक नियोजनात समाजातील इतर घटकांच्या सहभागाबरोबरच शेतमजूर या सर्वार्थाने दुर्लक्षित घटकाचाही सहभाग अतिशय महत्वाचा आहे. म्हणूनच प्रस्तुत शोधनिबंधात शेतमजूर नेमके कोणाला म्हणावयाचे? त्यांची सर्वसाधारणपणे कोणती वैशिष्ट्ये असतात, भारतीय शेतमजुरांची सद्यस्थिती काय आहे? त्यांना कोणत्या आर्थिक व सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. व त्या समस्या निर्माण होण्यास कोणते घटक कारणीभूत ठरले आहेत. इत्यादी बाबींबरोबरच शेतमजुरांची स्थिती सुधारण्यासाठी सरकारने केलेल्या उपायांचे मूल्यमापन देखील सदर शोधनिबंधात करण्यात आले आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये (Objectives of Research)

१. शेतमजुरांची संकल्पना, वैशिष्टये व सद्यस्थिती अभ्यासणे.
२. भारतीय शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे
३. शेतमजुरांच्या समस्यांस जबाबदार असणाऱ्या कारणांचा शोध घेवून त्यावर उपाय सूचविणे.
४. शेतमजुरांअभावी शेतीवर होणाऱ्या परिणामांकडे लक्ष वेधने.
५. शेतमजुरांसाठी शासन राबवत असलेल्या योजनांचे मूल्यमापन करणे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

संशोधनाची गृहिते (Assumptions of Research)

१. शेतमजुरांच्या समस्यास अनेक कारणे जबाबदार असली तरी मुळ कारण शेतमजुरांची मोठी व वाढती संख्या हेच आहे.

२. शेतमजुरांच्या विविध समस्यांमुळे संबंधित लोकांच्या जीवनमानाबरोबरच शेती विकास व पर्यायाने देशाच्या विकासावरही त्याचा दूरगामी परिणाम होत आहे.

संशोधन पध्दती (Research Methodology)

प्रस्तुत शोधनिबंधासाठी (**भारतीय शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास**) प्रामुख्याने विविध अहवाल, संदर्भग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट यासारख्या व्दितीयक साधन सामुग्रीचा आधार घेण्यात आलेला असून वर्णणात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

शेतमजुरांची व्याख्या व संकल्पना (Definition and Concept)

शेतमजूर हा शेती व्यवसायातील एक महत्वाचा घटक असून त्याची व्याख्या करणे सोपे नसले तरी काही चौकशी समीत्या व तज्ज्ञांनी शेतमजुरांचा अर्थ स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

१)**सन १९५०–५१ ची शेतमजूर चौकशी समिती** : ''जे लोक मजुरीवर पीक घेण्यासाठीच्या कार्यात सहभागी होतात त्यांना शेतमजूर म्हणावे.''

२)**सन १९५६–५७ ची दुसरी शेतमजूर चौकशी समिती** : ''शेतीमध्ये काम करणारे तर शेतमजूर असतातच शिवाय दुग्धपालन, पशुपालन, कुक्कुटपालन इत्यादी व्यवसायातील लोकसुद्धा शेतमजुरांच्या गटात येतात.''

३)**राष्ट्रीय श्रम आयोग** : ''ज्या व्यक्ती अकुशल आणि स्वसंघटित असून उपजिवीकेसाठी त्यांच्याजवळ श्रम हेच एकमेव साधन आहे त्यांना शेतमजूर म्हणता येईल.''

थोडक्यात, आपल्याला असे म्हणता येईल की, सर्वसाधारणपणे सशेतीत काम करण्यासाठी ज्यांना तात्पुरते किंवा विशिष्ट कालावधीसाठी वेतन देऊन कामावर ठेवले जाते त्यांना शेतमजूर म्हणतात.''

शेतमजुरांची वैशिष्ट्ये (Features of Agricultural Labour)

सर्वसाधारणपणे आपणाला भारतीय शेतमजुरांची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. शेतमजुरांना उपलब्ध असणारा रोजगार संधीच्या मानाने शेतमजुरांची संख्या अतिरिक्त आहे.

२. इतर क्षेत्रातील मजुरांमधील निरक्षरतेच्या तुलनेत शेतमजुरांमधील निरक्षरतेचे प्रमाण अधिक मोठे आहे.

३. शेतमजूर संपूर्ण देशभर पसरलेले / विखुरलेले आहेत.

४. औद्योगिक क्षेत्रातील कामगार सर्वसाधारणपणे कुशल आहेत तर शेतमजूर अकुशल आहेत.

५. शेतमजुरांची सौदाशक्ती अतिशय कमी आहे.

६. इतर कामगारांना मिळणाऱ्या मजुरी दराच्या तुलनेत शेतमजुरांना मिळणाऱ्या मजुरीचा दर अल्प आहे.

भारताच्या कृषीमधील श्रमशक्तीचे वितरण

भारताच्या वेगवेगळया कालखंडात कृषीमधील श्रमशक्तीचे वितरण कसे होते व त्यामध्ये कसे बदल होत गेले हे आपणाला तक्ता क्रमांक १ वरून लक्षात येते.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

कृषीमधील श्रमशक्तीचे कालखंडनिहाय वितरण (१९६१ ते २०११)

वर्ष	एकूण लोकसंख्या (कोटीमध्ये)	कृषीमधील एकूण कामगार संख्या (टक्केवारीमध्ये)	शेती कसणाऱ्यांची संख्या (टक्केवारीमध्ये)	शेतमजुरांची संख्या (टक्केवारीमध्ये)
१९६१	४३.९	७२.३६	५२.८०	१९.५६
१९७१	५४.८	७०.१२	४३.१४	२६.९८
१९८१	६८.३	६८.३५	४२.३३	२६.०२
१९९१	८४.४	६७.०१	३९.८५	२७.१६
२००१	१०२.७	५८.४०	३१.८५	२६.६९
२०११	१२१.०	५४.६०	२४.६०	३०.००

Source: NSSO Reports 61st & 66th Rounds, Census of India, KPMG Analysis.

वरील तक्ता क्रमांक १ चे निरीक्षण केले असता आपल्या असे लक्षात येते की, सन १९६१ मध्ये शेतीमधील एकूण श्रमशक्तीपैकी शेतमजुरांची संख्या ही केवळ १९.५६ टक्के इतकी होती. त्यामध्ये सातत्याने वाढ होवून सन २०११ मध्ये ती ३०.०० टक्के इतकी झाली. म्हणजेच १९६१ ते २०११ या पन्नास वर्षाच्या कालावधीत शेतमजूरांच्या संख्येत जवळपास दीड पटीपेक्षाही अधिक (१.५३ पट) वाढ झाल्याचे दिसून येते.

भारतीय शेतमजुरांच्या आर्थिक समस्या (Economics Problems)

१. **हंगामी रोजगाराची समस्या :** शेती व्यवसायात हंगामाच्या काळातच रोजगार उपलब्ध होत असल्यामुळे हंगामाचा काळ वगळता उर्वरीत दिवस शेतमजुरांना बेकार रहावे लागते. त्यांची मजुरीही अनिश्चित स्वरूपाची असते. त्यामुळे त्यांच्या कुटुंबाचे राहणीमान समाजातील सर्वात खालच्या पातळीचे आहे.

२. **बेरोजगारीची समस्या :** वास्तविक पाहता शेतमजुरांच्या रोजगारांचा कालखंड हा निरनिराळया घटक राज्यात, निरनिराळया पिकांच्या बाबतीत निरनिराळा असल्यामुळे पहावयास मिळते. ज्या भागात नियमित व निश्चित स्वरूपाच्या सिंचनसोई आहेत अशा ठिकाणी वर्षात दोन–तीन पिके काढता येणे शक्य असते. (भारतात स्थूल सिंचित क्षेत्र ४५ टक्के इतके आहे.) परंतु आज देशातील बहुतांश भागात शेतमजूरांना वर्षातून ४ ते ६ महिने बेकारीला तोंड द्यावे लागते.

३. **अल्प मजूरीची समस्या :** शेतमजुरांना कृषी हंगामाच्या काळात जरी तुलनेने अधिक मजुरी मिळत असली तरी वर्षभराचा विचार करता मिळणारी सरासरी मजूरी ही अतिशय कमी असते. त्यातून शेतमजुरांना मुलभूत गरजाही पूर्ण करणे शक्य होत नाही.

४. **यांत्रिकीकरणाची समस्या :** अलिकडे शेती व्यवसायाचे अधिकाधिक यांत्रिकीकरण केले जात असल्याने प्रत्यक्षात शेतमजुरांची बेकारी आणि न्यून रोजगार यामध्ये वाढ होत आहे. आज देशातील यांत्रिकीकरणाखालील स्थूल शेतजमीनीचे प्रमाण १९० लक्ष हेक्टर इतके आहे. त्यामुळे ज्याच्या अंगी शेतकीय यंत्रसामुग्री हाताळण्याचे कौशल्य नाही अशा शेतमजुरांच्या बाबतीत बेरोजगारीचे भय अधिक आहे.

५. **किंमत वाढीची समस्या:** भारतात सन १९७० पासून वाढत्या किंमतीची प्रवृत्ती निर्माण झाली असून अस्थिर व अत्यल्प उत्पन्न असणाऱ्या शेतमजुरांची स्थिती अधिकच कष्टमय झाली आहे. तसेच अलिकडील काळात पैशाचे मूल्य देखील मोठया प्रमाणात घटल्याने जीवनावश्यक वस्तू खरेदी करणेही शेतमजुरांना दुरापास्त झाले आहे.

६. **दारिद्रयाची समस्या:** भारतीय शेतमजुरांना मिळणारे उत्पन्न जेमतेम त्यांच्या उदरनिर्वाहापुरते असल्याने त्यांच्यामध्ये मोठया प्रमाणात दारिद्रय असल्याचे आढळून येते. शेतमजुरांची मूले दारिद्रयामुळे शिक्षण आणि प्रशिक्षणापासून वंचित राहतात. परिणामी शेतमजुरांमध्ये पिढयांन–पिढया शेतमजूरी करण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो. म्हणजेच शेतमजुरांना दारिद्रयाच्या दुष्टचक्राचा आयुष्यभर सामना करावा लागतो.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

७. **कर्जबाजारीपणा :** शेतमजुरांना मिळणारे उत्पन्न अल्प असल्यने त्यांना अनेक वेळा नातेवाईक, खाजगी सावकार किंवा जमीनदारांकडून चढया दराने कर्ज घ्यावे लागते. त्यामुळे कर्ज फेडण्यासाठी अल्प मजुरीवरदेखील काम करावे लागते.

८. **सामाजिक सुरक्षिततेचा अभाव:** शेतमजुरांना इतर क्षेत्रातील कामगारांप्रमाणे सामाजिक सुरक्षितता मिळत नाही. वृद्धपकाळासाठी, अपघात झाला असता मिळणारी नुकसान भरपाई, मोबदला त्यांना मिळत नाही.

भारतीय शेतमजुरांच्या सामाजिक समस्या (Social Problems)

१. **सामाजिक प्रतिष्ठा नाही:** शेतमजुरांची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट असल्याने त्यांच्यात निरक्षरतेचे प्रमाण खूपच अधिक आहे. त्याचप्रमाणे अशा कुटुंबांना आपल्या दैनंदिन जीवनावश्यक गरजा पूर्ण करण्याइतपत उत्पन्न मिळविण्यासाठी कुटुंबातील स्त्रीया आणि मुले यांना मिळेल त्या कामावर मिळालेल्या अल्प मजुरीवर काम करणे भाग पडते. अशा कुटुंबांना समाजात स्थान नसते. कोणत्याही सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रात त्यांच्या मताला किंमत नसते. एवढेच नव्हे तर त्यांना स्वत:चे मतदेखील नसते. त्यांना आर्थिकदृष्टीने सबल असणाऱ्या व्यक्तीच्या मतानुसारच आपले स्वत:चे मत बनवावे लागते.

२. **बदलती समाज मानसिकता:** आज ग्रामीण भागात शेतमजुरांना विशेषत: त्यांच्या मुलांना शेती व्यवसायात काम करणे कमीपणाचे वाटते. त्यामुळे अनेकवेळा ते काम उपलब्ध असताना देखील कामाला जात नाहीत. परिणामी त्यांना बेकारीचा सामना करावा लागतो.

३. **शेतमजुरांचे सामाजिक शोषण:** भारतातील बहुतेक शेतमजूर हे प्रामुख्याने अनुसूचीत जाती व जमातीतील असल्याने या शेतमजुरांना प्राप्त झालेला सामाजिक दर्जा हीन समजला जातो. तसेच ते दारिद्रयाने ग्रासलेले असल्याने आणि असंघटित असल्याने त्यांची पिळवणूक खेडयातील जमीन मालक करतात.

एकूणच, वरील सर्व आर्थिक व सामाजिक समस्यांमुळे भारतातील शेतमजूरांची स्थिती अत्यंत हलाखीची झाली आहे.

शेतमजुरांच्या समस्या निर्माण होण्यास जबाबदार असणारी कारणे

भारतातील शेतमजुरांच्या समस्या निर्माण होण्यास आणि त्या समस्या अधिक तीव्र करण्यास पुढील कारणे जबाबदार आहेत.

१. **वाढती लोकसंख्या:** भारताची लोकसंख्या स्वातंत्र्यानंतर अधिक वेगाने वाढून १२५ कोटीपेक्षा अधिक झाली आहे. परंतु या वाढत्या लोकसंख्येला आवश्यक तेवढी जमीन उपलब्ध नाही. तसेच भारताचा औद्योगिक विकास मंद गतीने होत असल्याकारणाने रोजगाराच्या दृष्टीने वाढत्या लोकसंख्येला उदयोगधंदे सामावून घेऊ शकत नाहीत. त्यामुळे हा भार शेतीवर पडून शेतमजुरांच्या संख्येत वेगाने वाढ झाली व समस्या निर्माण झाल्या.

२. **निसर्गावरील अवलंबित्व :** भारतीय शेती निसर्गावर अवलंबनू असल्याने शेती उत्पादनात निश्चितता नसते. त्यामुळे शेतीवर अवलंबून असणाऱ्यांना देखील उत्पन्नाची हमी नसते. ते अधिक दैववादी बनतात.

३. **शेतजमीनीचे विषम वाटप :** भारतातील शेतजमीनीचे वाटप विषम झाले आहे. म्हणजेच काहींना स्वत:ची जमीन काहीच नाही तर काहींच्या मालकीचे मात्र खूप मोठे धारणक्षेत्र असल्याचे पहावयास मिळते.

४. **लघु व कुटीरद्योगाचा ऱ्हास :** भारताच्या ग्रामीण भागातील लघु व कुटीर उद्योगांचा ऱ्हास झाल्यामुळे अशा उद्योगावर पुर्वी जे लोक गुजराण करीत होते त्यांना आता आपल्या उपजीविकेसाठी शेती व शेतमजूरी हाच पर्याय शिल्लक राहिला. याचा परिणाम म्हणून शेतमजूरांच्या संख्येत वाढ होवून शेतमजुरांच्या समस्या अधिक तीव्र बनल्या आहेत.

५. **असंघटीत स्वरूप :** ब्रिटीश काळातच नव्हे तर स्वतंत्र भारतातही शेतमजूर असंघटित राहिले आहेत. परिणामी त्यांची सौदाशक्ती अत्यल्प राहिली आहे.

थोडक्यात, भारतीय शेतकऱ्यांच्या समस्या निर्माण होण्यास व त्याअधिक तीव्र होण्यासाठी मानवनिर्मित व निसर्गनिर्मीत अशी दोन्हीही कारणे जबाबदार असली तरी मानवनिर्मित कारणे अधिक महत्वाची असल्याचे लक्षात येते.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

शेतमजूरां अभावी शेतीवर होणारे परिणाम (Effects)

योग्यवेळी मजूर न मिळाल्याने शेतीकामे वेळेवर होत नाहीत. परिणामी उत्पादन क्षमतेवर विपरीत परिणाम होऊन उत्पादन घट होते. उत्पादन घटल्यास मशागत, बियाणे, खते, किटकनाशके इत्यादींवर केलेल्या खर्चाचा भार शेतकऱ्याला सहन करावा लागतो. तसेच मजुरांअभावी वेळेवर न झालेली कामे उशिरा केल्याने वेळ व मजुरीचा खर्च अधिक वाढतो. मजुरांची मागणी वाढल्याने मजुरीचे दरही वाढतात. एकंदरीत शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च वाढतो. व उत्पन्नापेक्षा खर्च वाढल्यानंतर आता शेती परवडत नाही या मतांपर्यंत शेतकरी येतो. व त्याच्यामध्ये नैराश्य येते.

शेतमजुरांसाठीच्या शासकीय उपाययोजनांचे मूल्यमापन (Evaluation)

भारतीय शेतमजुरांच्या समस्या सोडविण्यासाठी आतापर्यंत शासन, व्यक्ती आणि संस्था यांनी प्रयत्न केलेले आहेत. सरकारने शेतमजुरांच्या समस्या सोडविण्यासाठी अनेक योजना तयार करून त्या राबविल्या आहेत. तसेच अनेक संस्था स्थापन करून त्यांच्यामार्फत कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. परंतु या सर्व योजनांचे निश्चित केलेले उद्दिष्टे साध्य करण्यात मर्यादित यश आले आहे. कारण या सर्व योजना व कार्यक्रमांचा लाभ ज्यांच्याकरीता या योजना राबविल्या जात आहेत त्यांच्यापर्यंत पोहचतच नाही. त्याची कारणे प्रशासकीय व व्यवस्थापकीय स्वरूपाची आहेत. तसेच ज्यांना या योजनांपासून लाभ होणार आहे त्यांनाही अज्ञानामुळे आपल्याला होणाऱ्या लाभाची माहिती नसते.

शेतमजुरांच्या समस्या सोडविण्यासाठी सरकारने विविध कायदे करून त्याची अंमलबजावणी केली असली तरी यालाही फारसे यश आलेले दिसत नाही. तसेच अनेक व्यक्ती व संस्था यांनी शेतमजुरांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांच्या संघटना बांधून लढे उभारण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु शेतमजुरांचे अज्ञान, अशिक्षितपणा, दारिद्रय यासारख्या अडचणींमुळे त्यांच्या संघटना होऊ शकत नाही. आणि झाल्या तरी त्या टिकू शकत नाहीत. कारण शेतमजूर एकाच कामावर संख्येने अधिक असत नाहीत. त्यामुळे त्यांना एकत्र आणणे, त्यांची संघटना होणे अवघड असते. संघटनेव्दारा कामगारांची सौदाशक्ती वाढवून त्यांच्या समस्या सोडविणे हे औद्योगिक क्षेत्रात शक्य असते. परंतु शेतमजुरांच्या बाबत हा मार्ग दुरापास्त आहे. म्हणून ही उपाययोजनाही फारशी यशस्वी होत नाही.

निष्कर्ष (Conclusion)

१. सर्वसाधारणपणे भारतीय शेतमजुरांसमोर हंगामी रोजगार, बेरोजगारी, अल्पमजूरी, यांत्रिकीकरण, किंमतवाढ, दारिद्रय, कर्जबाजारीपणा या सारख्या आर्थिक समस्या तर सामाजिक प्रतिष्ठेचा अभाव, बदलती समाज मानसिकता, शेतमजुरांचे सामाजिक शोषण अशा सामाजिक समस्या आढळून येतात.

२. शेतमजुरांच्या समस्या निर्माण होण्यास व त्या अधिक तीव्र होण्यासाठी मानवनिर्मित व निसर्गनिर्मित कारणे जबाबदार आहेत. परंतु त्यापैकी मानवनिर्मित कारणे अधिक महत्वाची असल्याचे आढळून येते.

३. भारतीय शेतमजुरांच्या समस्या निर्माण होण्यास प्रामुख्याने वाढती लोकसंख्या, निसर्गावरील शेतीचे अवलंबित्व, शेत जमीनीचे विषम वाटप, लघु व कुटीरउद्योगांचा ऱ्हास, असंघटित स्वरूप हे घटक जबाबदार आहेत.

४. सन १९६१ मध्ये शेतीमधील एकूण श्रमशक्तीपैकी शेतमजुरांची संख्या ही केवळ १९.५६ टक्के इतकी होती. त्यामध्ये सातत्याने वाढ होवून सन २०११ मध्ये ती ३०.०० टक्के इतकी झाली. म्हणजेच १९६१ ते २०११ या पन्नास वर्षाच्या कालावधीत शेतमजुरांच्या संख्येत जवळपास दीड पटीपेक्षा अधिक (१.५३ पट) वाढ झाल्याचे दिसून येते.

५. भारतीय शेतमजुरांमध्ये अनुसूचीत जाती व जमातीच्या लोकांचे प्रमाण सर्वाधिक असून मोलमजूरी हेच या वर्गातील लोकांच्या उत्पन्नाचे एकमेव साधन असल्याचे आढळते.

६. भारतीय शेतमजुरांच्या समस्या सोडविण्यासाठी आतापर्यंत शासन, व्यक्ती आणि संस्था यांनी निश्चितपणे प्रयत्न केलेले आहेत. परंतु सदरील प्रयत्न शेतमजुरांचे परावलंबित्व कमी करण्यास अपुरे पडल्याचे स्पष्ट होते.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

उपाययोजना (Remmedies)

१. देशाचा सर्वांगीण व जलद गतीने विकास करण्यासाठी देशाच्या आर्थिक नियोजनात समाजातील इतर घटकांच्या सहभागाबरोबरच शेतमजूर या सर्वार्थाने दुर्लक्षित घटकांचा सहभाग अतिशय महत्वाचा आहे.

२. शेतमजुरांना किमान वेतन आणि रोजगाराची हमी यासाठी शेती व्यवसायाचे हंगामी स्वरूप अर्थात निसर्गावरील अवलंबित्व कमी करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी बाराही महिने शेती करता येईल या दृष्टीने सिंचनाच्या सुविधा वाढविल्या पाहिजेत.

३. शेतमजुरांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी बेघर शेतमजुरांना अत्यल्प दरात घरासाठी जागा व ते बांधण्यासाठी अल्पदरात अर्थसाहाय्य त्यांच्या मुलांना मोफत कृषी शिक्षण इत्यादी सवलती द्याव्यात.

सारांश

भारतातील शेतमजुरांची स्थिती सुधारण्यासाठी शासकीय पातळीवरून आतापर्यंत अनेक प्रयत्न केले गेले आहेत. यापुढेही ते होत राहतील. पण एक वास्तव आपण स्वीकारले पाहिजे की, सर्वच शेतमजुरांना भारताच्या शेतीक्षेत्रात सामावून घेण्यास आता पुरेसा वाव नाही. त्यामुळे आपल्याला ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या व्दितीय व तृतीय क्षेत्राचा विकास घडवून शेती क्षेत्रातील ज्यादा श्रमशक्ती उदयोग व सेवा क्षेत्राकडे परावर्तीत केली पाहिजे. तसेच शेतमजुरांना शिक्षण देवून आणि स्वत:च्या संघटना स्थापन करण्याचे तंत्र शिकवून त्यांचा सामाजिक दर्जा कसा उंचावेल व त्यांचे संघटनात्मक सामर्थ्य कसे वाढेल यावर भर देणे अत्यंत आवश्यक आहे.

संदर्भसूची (References)

१. चव्हाण हिरामण (२०१०), *''शेतमजुरांचा प्रश्न : भारतीय शेतीपुढील एक नवे आव्हान''*, लेख, अर्थसंवाद, जुलै–सप्टेंबर २०१०.

२. काळे वा. सी. अ. कि. डोईफोडे आणि उमेश राजदेरकर (२००२), *''ग्रामीण भारताच्या समस्या''*, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्तीविद्यापीठ, नाशिक.

३. देसाई आणि भालेराव (२००९), *''भारतीय अर्थव्यवस्था''*, निराली प्रकाशन, पुणे.

४. भालेराव रमेश (२०१६), *''शेतीक्षेत्रातील मजूरांचा तुटवडा''*, लेख, अर्थसंवाद, ऑक्टोंबर–डिसेंबर २०१६.

५. रावीकर यशवंत, वि. ज. गोडबोले, जॉन्सन बोर्जेस (२००८), *''डायमंड अर्थशास्त्रकोश''*, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

६. लांजेवार नरेंद्र (२००७), *''शेतकऱ्यांच्या आत्महत्या : चिंतन आणि उपाय''*, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली.

७. विखे पाटील बाळासाहेब (२०१४), *''छोटा शेतकरी – शेतमजूर हेच धोरणाच्या केंद्रस्थानी हवेत''*, लेख, दैनिक लोकसत्ता, २६ फेब्रुवारी २०१४.

8. Menon P.S.K. and Vidya Sesharori (2014), *"National Commission for Women"*, Report of the National Task Force on Technological Empowerment of women in Agriculture, New Delhi.

9. Nilakshi Goswami and Anjan Kumar Bordoloi (2013), *"Female Participation in Agriculture"*, Int. J. Basic Applied & Social Science.

10. Reddy S. Subha (2005), *"Agricultural Economics"*, Oxford-IBH Publishing Co. Pvt. Ltd.

11. Lal Roshan and Ashok Khurana (2011),*"Gender Issues: The Role of women in agriculture sector"*, ZENITH, I NT. J. Business Economics & Management Res.

12. http://enwikipedia.org/agriculturallabour